म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९५२

# ...र्पण.

...प मातोश्री

.... गणेश मल्हार ...

यांचे सेवेशीं.

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणें.

मातोश्री,

...हानपणीं अंकावर खेळवितां खेळवितां वात्सल्याच्या भरांत सहज बोधामृत पाजलेंस, तेंच मला आज अमर करीत आहे. मी काव्य-सृष्टीच्या आनंदमय क्रीडावनांत विहरत आहें; हा वास्तविक माझा अधिकार नव्हे, तो तूं दिलेल्या शिक्षणाचाच होय.

त्याचें हें फलरूप काव्य

मी तुझ्या चरणीं

...र्पण करीत

आहें.

तुझा पुत्र,

—दामो...

REFBK-0004264
REFBK-0004264
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४२६४

REFBK-0004264
REFBK-0004264

# प्रस्तावना.

काव्य म्हटलें कीं, हृदयाला हलवून त्याच्या लाटा उसळवून वर आणावयाच्या, हा त्याचा साहजीक धर्मच आहे. या धर्माला जागणारें काव्यच पात्रता पावतें. असें काव्य जगाच्या वातावरणांत आपणाला कायमचें स्थान पहात असतें. किंबहुना त्याचा तो अधिकारच होय. उज्वल हिराच कोंदणांत बसतो हें खरें पण, त्याला तेजस्विता, मोहकता, निर्मलता, पैलुदारपणा वगैरे स्वाभाविक गुण आंगीं असतील तर; नाहींपेक्षां कांच आणि पाच सारखीच.

प्रस्तुत काव्याचे लेखक श्रीयुत कळंबेकर कवि यांचा परिचय करवीरवासियांना नवा नाहींच. परस्थांना जरी ते नवे असले, तरी त्यांची ओळख अगदीं थोडक्यांत पटण्यासारखी आहे. जळगांवानंतर १४ वर्षांनीं निद्रित कवींना जागें करणारें करवीरीं जें कवि-

संमेलन भरलें त्याचे हे सेक्रेटरी होते, या एकाच कारणानें ते महाराष्ट्राच्या परिचयाचे आहेत. त्यांची रसवंती कोणास चाखावयास मिळाली असेल असें जरी ह्मणवत नाहीं, तरी ती करवीरांतील व इतरत्र पुष्कळशा रसिकांना त्यांच्या काव्य वाचनानें पटली आहे. तिच्याबद्दल मी माझ्या भाषेत इतकेंच सांगतों कीं:—

काव्य गिरा बहु रुचिरा चतुरा प्रचुरा
सुसंगितासु-वरा ।।
रंगीं रंगवि रसिकां सर्वांनाही
प्रमोददा सु--वरा ।।

असाच दिव्य आमोद प्रसवणारी आहे; इतकेंच नव्हे, तर सहज सृष्ट आहे. रसिकाला तिची लालसा असावयाचीच. ती पूर्ण करणें हें माझ्यासारख्याच्या हातीं येणें ह्मणजे—

" पुष्पांच्या सौगंधें सूत्रालाही
घडे शिरीं वास ।। "

४२९४

या सुभाषितास आणि ' मनुष्य-स्वभाव स्वाभाविकच स्वार्थलोलुप असतो ' याला अनुसरून मीहि हें अप्राप्य, पवित्र श्रेय हातीं आलेलें दवडून मनुष्य स्वभावहीन तरी कां व्हावें? या हेतूनें खालील दोन शब्द लिहितों.

प्रस्तुतच्या लघु काव्यांत कवि श्रीयुत कळंबकर हे गुढीच्या पाडव्यास जो रूढीचा ध्वज उभारिला जातो, त्याजवर आपल्या मनांतील निरनिराळे विचार पुढें मांडून ध्वजारोपणाचे कारणाबद्दल साशंक आहेत. त्यांचा विचार प्रत्येकास सहजीं पटणारा आहे. उत्तर जाणून आपण होऊनच समाज-चित्र पुढें आणतात. तें चित्र इतकें उद्वेगदार आहे कीं, त्यांच्या कारण मिमांसेची निराशाच होते, ह्मणून स्वतः मौनावतात. नंतर मनुष्यमात्राच्या महत्वकांक्षेच्या सुष्ट स्वभावास अनुसरून ध्वजाला जबाब विचारतात. पण त्याचे उलट कौतुकच करतात. असा बहारीचा प्रसंग गुंफून सोडिला आहे, तो मनन करण्यासारखा आहे.

खरोखर आपण दरसाल गुढी उभारितों, पण कधीं कांहीं विचार करतों का? नाहीं. तिचें कारण गुलदस्तांतच राहतें. कित्येक ह्मणतील कीं, ही ही नव्या वर्षाची आठवण आहे. पण त्यांना आमचें असें विचारणें आहे कीं, प्रत्येक उगवता दिवस-मागल्या दिवसानंतरचा--नवाच दिवस नव्हे कां? मग यांत अधिक तें काय आहे? श्रीविक्रमादित्याच्या संवतास कोणी गुढी उभारीत नाहींत, श्रीशालिवाहन शकालाच कां उभारिली जाते? याचा विचार केला आहे? जगांत रूढि रूढ कां होते याचा विचार कोण करणार? सर्वच गतानुगतिक असतात. उलट विचार करणारा एखादाच. ह्मणून सिंहावलोकन होऊन नवीन जोम यावा हें कवींचें हृद्गत या लघु काव्यांत बहारीनें निगडीत झालें आहे. हें सहज सृष्ट काव्य आंगच्या माधुर्यानें, ओजस्वितेनें, प्रसादानें वाचकांचें अंतःकरण आकर्षून घेणारें आहे. करितां काव्यविवेचन करण्याच्या भरीस न पडतां तें सहज पाचक व आमोदक आहे एवढेंच लिहून पुरें करितों.

भा. क. मं. चै. शु. १. ) माधव गोपाळ बाकरेकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४२६४
[illegible]

श्री.

# ध्वज.

" शूरांनो या त्वरा करा रे ।
समतेचा ध्वज उंच धरा रे ॥
—केशवसुत.

१

सलज्ज असते
प्रभाकराचें
स्वागत करतांना ॥
तशीच दिसली
पूर्व सखी हे
आजहि बघतांना ॥
अनुरागानें
लाल-लालसे
गाल तिचे दिसले ॥

वसंतराया
किंवा आद्धा
म्हणुनी आदरिलें ॥

ध्वजा रोवुनी
सर्वांनीं हें
स्वागत मांडियलें ॥

कीं सृष्टीचें
गूढ उकललें
त्याचें स्मृति--चिन्ह ॥

गूढ म्हणोनी
गुढि नामें तें
शोभवितें सदन ॥

ज्ञात्याचें हें कार्य
कसें पारे
घरोघरीं नाचें ॥

काय असावें
कारण मग हें
धर्मांतरपणाचें ॥

× × × × × ×

अस्पृश्यांचा
स्पर्श--काल हा
कारण कीं याला ॥
गुणकर्माचें
ज्ञाती--बंधन
पटलें विश्वाला ॥
गो--हंबरडा
ऐकूं आला
काय कसायांना ॥
गो -रक्षण
कार्यास वाहिलें
निज अंतःकरणा ॥

आजहि नित्या—

परी रवीला

चुंबनही दिधलें ॥

आनंदाचे

हसोस्याचें

अश्रु थबथबले ॥

एकांताचे

भाव आजहि

परस्परां कळले ॥

प्रेमाच्या

सृष्टींत चालती

हौसेचे खेळ !

तेहि मांडिले

परस्परांनीं

जाणोनी वेळ ॥

दृष्टीला निज—

दृष्टी भिडतां

मीरावे नयन ॥

हांसावें मग
मुरकावें मग
पदर सांवरून ॥

प्राचि-रवीचें
असें खेळणें
हें तर नित्याचें ॥

काय असावें
कारण मग हें
ध्वजारोपणाचें ॥

× × × × ×

गत--विभवाचा
पूर्व दिशेला
वायू कीं वाहे ॥

भाग्यश्रीचें
पूजन वाळें
पाहुनि उत्साहें ॥

वसंतराय

किंवा आज्ञा

म्हणुनी आदरिलें ॥

ध्वजा रोवुनी

सर्वांनीं हें

स्वागत मांडियलें ॥

कीं सृष्टीचें

गूढ उकललें

त्याचें स्मृति-चिन्ह ॥

× × × ×

गूढ म्हणोनी

गुढि नामें तें

शोभवितें सदन ॥

ज्ञास्याचें हें कार्य

कसें पारे

घरोघरीं नाचें ॥

काय असावें

कारण मग हें

ध्वजारोपणाचें ॥

× × × × × ×

अस्पृश्यांचा

स्पर्श--काल हा

कारण कीं याला ॥

गुणकर्माचें

ज्ञाती--बंधन

पटलें विश्वाला ॥

गो--हंबरडा

ऐकूं आला

काय कसायांना ॥

गो-रक्षण

कार्यास वाहिलें

निज अंतःकरणा ॥

मांगल्याचा
मळवट भरला
विधवा--बालांनीं ॥

किंवा गणिल्या
सर्वांठायीं
पवित्र सर्वांनीं ॥

प्रीति विवाहा
सज्ज होउनी
किंवा हें राष्ट्र ॥

खेळूं लागलें
संसाराचा
काय सारिपाट ॥

'स्नेहलतेचा'
पटुनी किंवा
धनिका संदेश ॥

हुंड्यावांचून
'शुभ--मुख' बघण्या
झाला त्या हर्ष ॥

निज धर्माची
लाज घाटली
किंवा जरटांना ॥

सावध झाले
या दिवसाला
वळवियल्या माना ॥

स्वधर्म--तत्वा
समजुनि ब्राह्मण
काय चालले की ॥

त्यांची तेवीं
इतर जनांची
घडली कीं एकी ॥

किंवा मम शिव —
राया केलें
स्वर्गी अभिषिक्त ॥

महाराष्ट्राच्या
प्रेमें परितीं
आला कां येथ ॥

किंवा भगवन्
टिळक पावले
॥ नूतन अवतारें ॥

संरक्षाया
भारतमाता
॥ करण्या कार्य पुरें ॥

राष्ट्र-सभेचें
बहुमत झालें
॥ काय विजयि आज ॥

बहु दिवसांचें
मांगल्याचें
॥ फळलें हें काज ॥

पंजरवासी
पंजाबाचा
॥ सिंह मुक्त झाला ॥

त्या दिवसाची
स्मृती राखिली
॥ कीं या दिवसाला ॥

जागा झाला
पुनः काय तो
बंगाली वाघ ॥

पुनर्गर्जना
तयें मांडिली
येऊनी राग ॥

गोखलवाजी,
गोपाळाची
सरली कां निद्रा ॥

नृप - जन--संगम
करावयाला
साहियली निंदा ॥

महाराष्ट्राच्या
पडत्या काळा
समर्थ अवतरले ॥

सद्बोधाच्या
अभ्रीवरती
छत्रपती चढले ॥

फिरूं लागला
धवल यशें कीं
घरोघरीं चरका ॥

श्री गांधींच्या
पवित्र कार्या
स्वदेश वळला कां ॥

कीं दासांच्या
स्वार्थत्यागें
चढुनी आवेश ॥

स्वार्थपरायण,
स्वार्थत्यागें
नटला हा देश ॥

× × × × × ×

समाजाकडे
पाहूं जातां
काय दिसें सांगा ॥

सामाजिक
चळवळी निमाल्या
येतां नच रंगा ॥

सांवट पडतां
अस्पृश्यांचा
विटाळ होतोच ॥

होतो ब्राह्मण
कर्मावांचुन
असला जरि नीच ॥

गो--हत्या त्या
तशाच होती
कठोरशा हृदयें ॥

रक्षण त्यांचें
कोण करीना
धनें मनें देहें ॥

पुनर्विवाहा
मोकळीक नच
अद्यापी येथें ॥

अमंगला त्या
विधवा-बाला
समजण्यांत येतें ॥

प्रीती वांचुनि
जन्म गांठिही
तशाच पडतात ॥

सौख्यपूर्ण
संसार भासतो
असार निमिषांत ॥

स्नेहलतेचा
कुणा न पटला
अजुनी संदेश ॥

जुळतीं लग्नें
पाहुन पुढचीं
हुंड्याची रास ॥

सरणावरतीं
जरी चालला
जरठ तरी हौशी ॥

तोल देत
निर्लज्जपणानें
उठतो लग्नाशीं ॥

आर्या आचरूं
तोच धर्म ही
घेउनि समजूत ॥

निज धर्माचा
विप्र करीती
पूर्ण अधःपात ॥

राष्ट्रिय प्रश्ना—
कडे पहातां
विपरित पाहूनी ॥

मतामतांचा
गुडगुस झाला
स्वराज्य कोठोनी ॥

सूतावांचुनि
'स्वराज्य' अडलें
हिंदुस्थानाचें ॥

मोह--पटलही
गेलें नाहीं
॥ या निज राष्ट्राचें ॥

निद्रित जनता
ऐकेना मुळिं
॥ राष्ट्राची हांक ॥

विजय कशाचा
होइल जेथें
मत नाहीं एक ॥

नसेच येथें
रक्षणकर्ता
॥ कोणहि कोणाचा ॥

नाशास्तव
झगडति परस्पर
॥ भाऊ न भावाचा ॥

साधू भोंदू
एकाचि येथें
॥ मुळीं नसे भेद ॥

नीती गेली<br>
भरला सारा<br>
पाखंडी वाद ॥<br>
सांग समाजा<br>
हर्ष जाहला<br>
कसला तरि तुजला ॥<br>
विजय--ध्वज<br>
लाविला कोणता<br>
शूरपणा केला ॥<br>
मंगल नाहीं<br>
विजयहि नाहीं<br>
ऐशा समयाला ॥<br>
विजय--ध्वज मग<br>
काय ह्मणोनी<br>
एथ उभा केला ॥<br>
महन्मंगला<br>
ध्वजा कशी तूं<br>
फडफडशी येथें ॥

४२६४ १६

येथ नांदतीं

मानवरूपें

भेसुरशीं भूतें ॥

अशा स्थळीं कां

फडफडशीरे

सांग सांग मजला ॥

चैतन्याचें—

नांवच नाहीं

असल्या समयाला ॥

( सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

REFBK-0004264
REFBK-0004264